# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४

परिपत्रक क्र.कोविमं/माध्य. परीक्षा/ २५४६ /दिनांक२८/१२/ २०१८

**विषय : मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे हजेरी क्षमापित करणे, आवेदनपत्र रद्द करणे, खेळाडू विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठविणेबाबत...**

(१) **विभागीय मंडळाकडून उपस्थितीमधील तूट क्षमापित करणेबाबत –**

नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व व्दितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ७५% भरणे आवश्यक आहे. उपस्थितीची गणना **प्रथम सत्र शाळा सुरू झाल्यापासून १५ ऑक्टोबर पर्यंत व दुसरे सत्र १६ ऑक्टोबर पासून ३१ जानेवारीपर्यंत धरण्यात यावी.** ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे सरासरी **६० टक्के ते ७५ टक्केच्या** दरम्यान आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्याचा अधिकार विभागीय अध्यक्षांना आहे.

**(२) राज्य मंडळाकडून उपस्थितीतील तूट क्षमापित करणेबाबबत..**

ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम व द्वितीय सत्रात स्वतंत्रपणे **अथवा** अपवादात्मक प्रकरणी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे **५० टक्के पेक्षा जास्त परंतु ६० टक्क्यापेक्षा कमी** आहे आणि त्रुटीचे कारण १) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार २)विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचे आकस्मित निधन ३)अनपेक्षित कारणांमुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडणे ४) नैसर्गिक आपत्ती ५) या खेरीज अन्य रास्त कारण असल्यास अशा कारणांच्या सबळ पुराव्यासह (दाखला, प्रमाणपत्र) सत्रवार हजेरीतील तफावतीची नोंद करून प्रस्ताव पाठवावेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वतंत्र परिशिष्ट द्यावे. प्रत्येक प्रकरणाची छाननी करून विभागीय अध्यक्षांच्या शिफारशीसह प्रस्ताव मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांच्याकडे अंतिम निर्णयासाठी पाठविण्यात येतील. याबाबत राज्य मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहिल.

**(३) आवेदनपत्र रद्द करणेबाबत**

ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे ७५ टक्के भरत नाही व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ५० टक्के ते ७५ टक्केच्या दरम्यानची आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्यासाठी आपणास शिफारस करावयाची नाही आणि त्यामुळे आवेदनपत्र रद्द करावयाचे आहे असे प्रस्ताव व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे अगर एका सत्रात ५० टक्केपेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवेदनपत्र रद्द करण्यासाठी विहीत तक्त्यात एकत्रितरित्या आपल्या शिफारशीने सादर करावेत.

**हजेरी कमी या कारणाखेरीज अन्य कारणास्तव आवेदनपत्र रद्द केले जाणार नाहीत तसेच उपरोक्त बाबत फेर प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

आवश्यकतेनुसार मंडळाकडून मुळ अभिलेखाची मागणी करण्यात येईल त्यावेळी ते सादर करावेत.

**तसेच दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ नंतर सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाला विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणासाठी प्रति विद्यार्थी प्रशासकीय शुल्क रु.५००/– आकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

(४) **राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत व भारतीयम या कार्यक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या जादा गुण सवलतीबाबत –**

चालू शैक्षणिक वर्षात (१ जून २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१९) राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्याने भाग घेतला असेल तरच अशा विद्यार्थ्यांना राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा युवक सेवा संचालनालयाने मान्य केलेल्या संस्था व क्रीडा प्रकारासाठीच हे गुण अनुज्ञेय असतील.

(i) खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण ग्राह्य धरण्यासाठी विभागीय मंडळाकडे सादर केलेल्या प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

(ii) विद्यार्थ्याने ज्या खेळात सहभाग घेतला असेल त्या खेळाचे आयोजन करणाऱ्या संघटनेचे नाव क्रीडा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यताप्राप्त यादीत असणे आवश्यक आहे.

(iii) नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या कवायतीमध्ये भाग घेणाऱ्या, तसेच नवी दिल्ली येथे आयोजित राष्ट्रपती रॅलीमध्ये भाग घेणाऱ्या स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनाही जास्तीत जास्त १५ गुण प्रदान करण्याची तरतूद आहे.

**विशेष गुण सवलतीचा लाभ फक्त नियमित विद्यार्थ्यांना लागू राहील. खाजगी/बहिस्थ विद्यार्थ्यांना** सदरची सवलत **अनुज्ञेय नाही, याची नोंद घ्यावी.** कोणताही पात्र नियमित विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. खेळाडू विद्यार्थ्यासाठी सवलतीच्या गुणांची विभागणी खालील प्रमाणे राहील.

अ) आंतराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग झालेल्या/प्राविण्य मिळविलेल्या किंवा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथम/ द्वितीय/ तृतीय प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना वाढीव २५ गुण देण्यात येतील.

ब) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेल्या किंवा राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम/ द्वितीय / तृतीय प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना वाढीव २० गुण देण्यात येतील.

क) क्रीडा विभागामार्फत आयोजीत करण्यात येत असलेल्या शालेय /ग्रामीण/महिला/इतर राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना वाढीव १५ गुण देण्यात येतील

वरील प्रमाणे क्रीडा सवलतीच्या गुणांची विभागणी असल्याने खेळाडू विद्यार्थ्यांनी स्पर्धा संपन्न झाल्यानंतर आपले अर्ज प्रमाणपत्रासह त्वरीत मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावेत, व मुख्याध्यापकांनी खेळाडू विद्यार्थ्यांच्या अर्जाची शहानिशा करून तो सात दिवसात संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावा. **जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी शिफारशीसह मंडळाने निर्धारीत केलेल्या विहित नमून्यात <u>३०एप्रिल २०१९</u> पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयाकडे पोहोचतील या बेताने हस्तपोच पाठवावेत. तदूंनतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.** माध्यमिक शाळाप्रमुखांनी यासंदर्भात प्रस्ताव सादर न केल्यामुळे, परिपूर्ण माहिती न कळविल्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यामुळे जर एखादा पात्र विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळा प्रमुखांवर राहील याची नोंद घ्यावी.

(५) <u>विशेष गरजा असलेले विद्यार्थी (दृष्टिबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, अस्थि विकलांग, बहुविकलांग, स्वमग्न) यांना मिळणाऱ्या सवलतीबाबत –</u>

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या परीक्षेमध्ये जादा वेळेची सवलत तसेच उत्तीर्ण होण्यासाठी मिळणाऱ्या जादा गुणांची सवलत इ. सवलती निर्दिष्ट केलेल्या आहेत. तथापि सदर दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव वेळेत सादर न केल्यामुळे किंवा परीक्षेनंतर सादर केल्यामुळे बरेच विद्यार्थी मंडळाच्या उपरोक्त सवलतीपासून वंचित राहतात, असे मंडळाच्या निदर्शनास आले आहे.

मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस अशा प्रवर्गातून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या सवलती मागणीसह प्रस्ताव व मंडळाने निर्धारित केलेल्या नमुन्याप्रमाणे मुळ वैद्यकिय प्रमाणपत्रावर सोबत जोडलेल्या विहित नमुन्याप्रमाणे जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रस्ताव सादर करावेत.

**तरी सर्व शाळा प्रमुखांनी वरील महत्त्वाच्या सर्व मुद्यांची नोंद घेवून त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, तसेच पालकांच्या तक्रारी येणार नाहीत, या दृष्टीने प्रयत्न करून उपरोक्तबाबतचे सर्व प्रस्ताव मंगळवार दिनांक <u>०५ फेब्रुवारी,२०१९</u> मंडळाकडे पोहोचतील अशा बेताने पोस्टाने अथवा हस्तपाहोच पाठवावेत.**

**सदरच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर लावून त्या सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी शाळा प्रमुखांची राहिल याची गंभीरपणे नोंद घ्यावी. उपरोक्त बाबतचे सर्व विहित फॉर्म व माहिती मंडळाचे संकेतस्थळ <u>www.sscboardkolhapur.in</u> वर उपलब्ध आहेत. ते पाहून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.**

२८/१२

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**सोबत:- विहित नमुन्यातील सर्व फॉर्म**

**प्रति,**

सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळाप्रमुख,
सातारा /सांगली / कोल्हापूर जिल्हा.

प्रत :- माहितीस्तव शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
सांकेतिक क्रमांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐

# परिशिष्ट VII-अ

## माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१

## आवेदनपत्र रद्दकरिता

प्रथम व द्वितीय सत्रामध्ये स्वतंत्रपणे ७५ टक्के पेक्षा कमी हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे रद्द करणेबाबत सादर करावयाच्या पपत्राचा नमुना

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | शाळा सुरू झाल्यापासून पहिल्या सत्रातील एकूण शालेय कामाचे दिवस १५-१०-२०१ पर्यंत | विद्यार्थ्यांचे पहिल्या सत्रातील हजरीचे दिवस | हजेरीचे टक्केवारी पहिले सत्र | दुसऱ्या सत्रातील एकूण शालेय कामाचे दिवस १६-१०-२०१ ते ३१-०१-२०१ पर्यंत | विद्यार्थ्यांचे दुसऱ्या सत्रातील हजेरीचे दिवस | हजेरीची टक्केवारी दुसरे सत्र | क. महाविद्यालय प्रमुखांची आवेदन पत्र रद्द करणेबाबतची स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

कॉलेजचा शिक्का :-

पहिले सत्र : शालेय कामाचा कालावधी शाळा सुरू झाल्यापासून दि. १५/१०/२०१...... पर्यंत एकूण दिवस ............

दुसरे सत्र : शालेय कामाचा कालावधी दिनांक १६/१०/२०१.... पासून दि. ३१/०१/२०१..... पर्यंत एकूण दिवस ............

प्राचार्यांची सही/शिक्का

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
सांकेतिक क्रमांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐

# परिशिष्ट VII-ब

माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१

## हजेरीतील ६०% ते ७५% तफावत क्षमापित करण्यासाठी सादर करावयाच्या प्रकरणांचा तक्ता

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | क. महाविद्यालय सुरू झाल्याच्या दिनांकापासून १५-१०-२०१ पर्यंत पहिल्या सत्रातील एकूण क. महाविद्यालयाचे कामाचे दिवस | विद्यार्थ्यांचे पहिल्या सत्रातील हजेरीचे एकूण दिवस | हजेरीचे टक्केवारी पहिले सत्र | १६-१०-२०१ ते ३१-०१-२०१ पर्यंतच्या दुसऱ्या सत्रातील एकूण कामाचे दिवस | विद्यार्थ्यांचे दुसऱ्या सत्रातील हजेरीचे एकूण दिवस | हजेरीची टक्केवारी दुसरे सत्र | प्राचार्यांनी हजेरीतील तफावत क्षमापित करणे बाबतची सकारण स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

दिनांक :

शाळा/क. महाविद्यालयाचा शिक्का

पहिले सत्र : शालेय कामाचा कालावधी शाळा सुरू झाल्यापासून दि. १५/१०/२००...... पर्यंत एकूण दिवस .............

दुसरे सत्र : शालेय कामाचा कालावधी दिनांक १६/१०/२०१.... पासून दि. ३१/०१/२०१..... पर्यंत एकूण दिवस .............

प्राचार्यांची सही/शिक्का



42

(४०)

# परिशिष्ट VII-क

## विद्यार्थ्याची ५०% ते ५९% दरम्यानची हजेरी क्षमापित करण्याबाबतचा नमुना फॉर्म

राज्यमंडळाचे कार्यालयाचे वापरासाठी

| |
|---|
| परीक्षेचे नांव : ____________ |
| विभागीय मंडळ, कोल्हापूर |
| प्रकरणिका क्रमांक ____________ |

१) परीक्षेचे नांव : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०१

२) विद्यार्थ्यांचे नाव : ____________

३) शाळेचे व क. महाविद्यालयाचे नाव : ____________

सांकेतीक क्रमांक : [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ]

पत्ता : ____________

४) दोन्ही सत्रातील विद्यार्थ्यांची सरासरी हजेरी :

| प्रथम सत्रातील हजेरी<br>शाळा / क. महाविद्यालय उघडण्याचा दिनांक ते दिनांक १५-१०-२०१ पर्यंत | | | | द्वितीय सत्रातील हजेरी<br>दि. १६-१०-२०१ ते ३१-०१-२०१ पर्यंत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रत्यक्ष कामाचे दिवस | ७५ टक्के दिवस | प्रत्यक्ष हजेरी | प्रत्यक्ष हजेरीची टक्केवारी | प्रत्यक्ष कामाचे दिवस | ७५ टक्के दिवस | प्रत्यक्ष हजेरी | प्रत्यक्ष हजेरीची टक्केवारी |
| | | | | | | | |

५) विद्यार्थ्याची हजेरी ५०% ते ५९% दरम्यान भरण्याचे कारण (खालील योग्य कारणावर (✓) अशी खूण करावी.)

अ) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार

ब) विद्यार्थ्यांची आई/वडिलांचे आकस्मित निधन

क) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यांस दरम्यान बऱ्याच कालावधीसाठी परगांवी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

ड) नैसर्गिक आपत्ती.

ई) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास.